(2)

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet :http/www.dte.org.in

अतिमहत्वाचे/ईमेलव्दारे

क्रमांक : 10/पदविका/एआरसी/समुपदेशन फेरी/2015/ ११८८
दिनांक : 26 OCT 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

विषय :- समुपदेशन फेरीमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची रक्कम मिळाली नसल्याबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, या संचालनालयामार्फत पदविका अभ्यासक्रमाची केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये समुपदेशन फेरी (कौन्सिलिंग राऊंड) घेण्यात येते. सदर फेरीसाठी प्रत्येक विद्यार्थ्यांकडुन रजिस्ट्रेशन फी (non-refundable) म्हणुन रक्कम रु. 3000/- घेण्यात येते व सदर रक्कम विद्यार्थी ज्या संस्थेत (केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत समावेश असलेल्या) प्रवेश निश्चित करतात, अशा संस्थाना सदर रक्कम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कामध्ये समयोजन करण्यासाठी परत केली जाते व ज्या विद्यार्थ्यांनी समुपदेशन फेरीमध्ये अलाटमेंट झालेल्या संस्थेत प्रवेश निश्चित केला नाही, अशा विद्यार्थ्यांची रक्कम या संचालनालयास जमा करण्यात येते. परंतु, समुपदेशन फेरीमधील केंद्राकडुन आजपावेतो शैक्षणिक वर्ष 2011-12 ते 2015-16 पर्यंतची समुपदेशन फेरीसाठी उमेदारांकडुन प्रत्येकी रक्कम रु. 3000/- प्रमाणे आकारण्यात आलेले अंतरिम शुल्क ज्या संस्थेत विद्यार्थ्याने प्रवेश निश्चित केलेला आहे अशा काही संस्थांना देय असलेली रक्कम प्राप्त झाले नसल्याचे या संचालनालयाचा निदर्शसनास आणुन दिले आहे.

त्याअनुषंगाने आपल्यामार्फत सर्व समुपदेशन फेरीमधील केंद्राना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणात संबंधित सहसंचालक यांनी व्यक्तीश: लक्ष देऊन केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यापासुन या संचालनालयाच्या संबंधित वर्षातील आदेशानुसार आजपावेतो समुपदेशन फेरीसाठी उमेदारांकडुन प्रत्येकी रक्कम रु. 3000/- प्रमाणे आकारण्यात आलेले अंतरिम शुल्क संबंधित संस्थांना देय असलेली रक्कम अदा केली नसल्यास संबंधित वर्षातील आदेशानुसार रक्कम तात्काळ अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा वर्षनिहाय अहवाल तात्काळ आपल्यामार्फत या संचालनालयास सादर करण्यात यावा.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 8026
27 OCT 2015

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत:- प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमातील संस्थांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

---

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.
क्र :–तंशिसं/विकाना/पदविका/२०१५/ 3369
दि. - 2 NOV 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित
पदवी/ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
नागपूर विभाग .

त्यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात नमूद केलेली माहिती तात्काळ या कार्यालयास दि. ५/११/२०१५ पर्यत या कार्यालयास वर्ष निहाय कळविण्यांत यावो

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.